मित्र यासाठी तर असतात

ब्रिंटन टरकिल, मराठी : अश्विनी बर्वे



थिओडोर हत्ती जंगलाच्या मधोमध बसला आहे. वाईट याचं वाटतं की त्याच्या पायाला जखम झाली आहे.
आज थियोडोर जंगललाच्या दुसऱ्या टोकाला आपल्या चुलत भावाला भेटायला जात होता.
“मी काय करू शकतो?” थियोडोरने म्हणाला. “माझा चुलत भाऊ जंगलाच्या दुसऱ्या टोकाला राहतो, आणि मी इथं जंगलाच्या मधोमध आहे. आणि माझ्या एका पायाला जखम झाली आहे, ज्यामुळे मी चालू शकत नाही.”



“मला माहीत आहे काय करायचं ते,” थियोडोर म्हणाला. “मी माझ्या मित्रांचा सल्ला घेईन. मित्र तर यासाठीच असतात.”

तेव्हा थिओडोरची मैत्रीण चिमणी तिथं आली. “तू इथं जंगलाच्या मधोमध का बसला आहेस?” चिमणीने विचारलं.



“कारण माझ्या पायाला जखम झाली आहे, आणि मी चालू शकत नाही.” थियोडोर म्हणाला. “आता मी जंगलाच्या दुसऱ्या टोकाला राहणाऱ्या माझ्या चुलत भावाला भेटायला जाऊ शकत नाही.”

“जर माझा पाय खराब झाला असता तर मी जंगलाच्या टोकापर्यंत उडत गेले असते,” चिमणी थियोडोरला म्हणाली.

“सल्ला दिल्याबद्दल आभारी आहे,” थियोडोर चिमणीला म्हणाला.

"दोस्त यासाठीच तर असतात,” चिमणी म्हणाली.



तेव्हाच थियोडोरचा मित्र आला, लांब पायांचा डॅडी लंब्या, “तू इथं जंगलाच्या मधोमध का बसलास?” डॅडी लंब्याने विचारले. “कारण की माझ्या पायाला जखम झाली आहे आणि मी चालू शकत नाही आणि मी उडू शकत नाही. आणि मी माझ्या चुलत भावाला जंगलाच्या दुसऱ्या टोकाला जावून भेटू शकत” थियोडोर म्हणाला.



“जर माझा पाय खराब असता, डॅडी लंब्या म्हणाला, “मी तरीही चालत गेलो असतो – कारण माझे इतर सात पाय आहेत.”

“सल्ला दिल्याबद्दल आभारी आहे,” थियोडोर म्हणाला.

"दोस्त तर यासाठीच असतात,” डॅडी लंब्या म्हणाला.



थोड्याच वेळात थिओडोरचा मित्र माकड आलं. “तू इथं जंगलाच्या मधोमध का बसला आहेस?” माकडाने विचारलं.

“कारण माझ्या पायला जखम झाली आहे आणि मी चालू शकत नाही, आणि मी उडू शकत नाही आणि माझे सात पाय नाहीत. आणि मी माझ्या चुलत भावाला जंगलाच्या दुसऱ्या टोकाला भेटायला जाऊ शकत नाही,” थियोडोर म्हणाला.



“जर मला जखम झाली असती तर,” माकड म्हणालं, “मी माझ्या शेपटीच्या मदतीने लटकत तिथं गेलो असतो.”

"ठीक आहे," थियोडोर म्हणाला, “माझी शेपटी खूप कमजोर आहे पण सोंड खूप मजबूत आहे.” मग थिओडोरने आपल्या सोंडेच्या मदतीने झाडाची एक फांदी धरली...



धड़ाम!

दुर्घटना!

"ठीक आहे," थियोडोर म्हणाला.

“तुझ्या सल्ल्यासाठी आभारी आहे.”

“मित्र तर त्यासाठीच असतात,” माकड म्हणाले.



मग थिओडोरचा दोस्त, खेकड़ा आला.

“तू इथं जंगलाच्या मधोमध का बसला आहेस?” माकडाने विचारलं.

“कारण माझ्या पायला जखम झाली आहे आणि मी चालू शकत नाही, आणि मी उडू शकत नाही आणि माझे सात पाय नाहीत. आणि मी आपल्या सोंडेने एका झाडावरून दुसऱ्या झाडावर जाऊ शकत नाही. आणि मी माझ्या चुलत भावाला जंगलाच्या दुसऱ्या टोकाला भेटायला जाऊ शकत नाही,” थियोडोर म्हणाला.



“जर माझ्या पायाला जखम झाली असती,” खेकडा म्हणाला, “तर मी त्या पायापासून सुटका करून घेतली असती आणि एक पाय उगवला असता.”

“तुझ्या सल्लासाठी आभारी आहे,” थिओडोर म्हणाला.

"दोस्त यासाठीच तर असतात,” खेकडा म्हणाला.



मग थियोडोरचा मित्र सिंह आला.
तू इथं जंगलाच्या मधोमध का बसला आहेस?" माकडाने विचारलं.
"कारण माझ्या पायला जखम झाली आहे आणि मी चालू शकत नाही, आणि मी उडू शकत नाही आणि माझे सात पाय नाहीत. आणि मी आपल्या सोंडेने एका झाडावरून दुसऱ्या झाडावर जाऊ शकत नाही. आणि मी दुसरा पाय उगवू शकत नाही. आणि मी माझ्या चुलत भावाला जंगलाच्या दुसऱ्या टोकाला भेटायला जाऊ शकत नाही," थियोडोर म्हणाला.



“जर मला जखम झाली असती,” सिंह म्हणाला, “तर इतक्या जोरात डरकाळी फोडली असती की जंगलातल्या प्रत्येकाला ऐकू गेली असती आणि काय झालं म्हणून प्रत्येकजण धावत बघायला आला असता.”

मग सिंहाने जोरात डरकाळी फोडली.



"कसला आवाज आहे?" ओपस्समने विचारलं. तो आपली शेपटीच्या मदतीने उलटा लटकला होता.

थियोडोरच्या सगळ्या मित्रांनी आता एकदम बोलायला सुरुवात केली.

"थियोडोर उडू शकत नाही," चिमणी म्हणाली. “तो आपल्या चुलत भावाला भेटण्यासाठी जंगलाच्या दुसऱ्या टोकाला जाऊ शकत नाही," सिंह म्हणाला.

“आम्ही त्याला चांगला सल्ला दिला. दोस्त तर त्यासाठीच असतात.”


"बकवास," ओपस्सम म्हणाला. "दोस्त मदत करण्यासाठी असतात. लवकर जाऊन थिओडोरच्या चुलत भावाला त्याच्याजवळ घेऊन या.”





मग सगळे मित्र जंगलाच्या दुसऱ्या टोकाला थिओडोरच्या चुलत भावाला शोधू लागले.

आणि मग ते चुलत भावाला थिओडोरला
भेटण्यासाठी घेवून आले.



मग थिओडोर, त्याचा चुलत भाऊ आणि सगळ्या दोस्तांनी मिळून एक पार्टी आयोजित केली. “तुमच्या सगळ्यांच्या मदतीबद्दल धन्यवाद,” थिओडोर आपल्या मित्रांना म्हणाला. “दोस्त तर यासाठीच असतात,” थियोडोरचे मित्र म्हणाले.





सल्ला देणं खूप चांगलं असतं, पण दोस्त त्यापेक्षाही अधिक काही करू शकतात. मित्रांनी नेहमी आपल्या दुसऱ्या मित्रांना मदत केली पाहिजे. दोस्त त्यासाठीच तर असतात.



समाप्त